**ठळक बातम्या**

- कसारा-मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका, पालघर-घोटी दरम्यान महामार्गाच्या चौपदरीकरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- आसाममध्ये आपात्कालीन परिस्थितीत विमान उतरवण्याच्या धावपट्टीसह विविध विकासकामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- देशातल्या लांब पल्ल्यांच्या ट्रेनमध्ये आता सर्वसाधारण वर्गाच्या कोचची स्वच्छता प्रथम श्रेणी दर्जाच्या कोचप्रमाणेच केली जाईल, अशी रेल्वेमंत्र्यांची घोषणा

- बांग्लादेशात नवनिर्वाचित सरकारचा बुधवारी शपथविधी, कायदा-सुव्यवस्था मजबूत राखण्याला सर्वोच्च प्राथमिकता देण्याचं बीएनपीचे अध्यक्ष तारीक रेहमान यांचं प्रतिपादन

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज इंग्लंड आणि आयर्लंडनं आपापले सामने जिंकले, न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना सुरू

**<><><><><>**

केंद्र सरकारनं कसारा ते मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तसंच घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमडळानं घेतलेल्या या आणि इतर निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(केंद्रीय मंत्रिमंडळाची नवी दिल्लीतल्या साऊथ ब्लॉकमधली शेवटची बैठक काल झाली. या पुढच्या बैठका सेवा तीर्थमध्ये होणार आहे. नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकच रुपांतर युगे युगीन भारत या संग्रहालयात होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. या बैठकीत झालेल्या निर्णयांविषयी माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत माहिती दिली. कसारा-मनमाड रेल्वे प्रकल्पाबद्दल ते म्हणाले...*

***होल्ड... बाईट- अश्विनी वैष्णव***

*राष्ट्रीय महामार्ग १६० ए च्या घोटी-त्र्यंबक-पालघर या टप्प्याचं चौपदरीकरण करण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळं दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग आणि समृद्धी महामार्गाशी हा भाग जोडला जाणार आहे. १५४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी ३ हजार ३२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.*

*१ लाख कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड उभारण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांना याचा लाभ होईल. यातून शहरांचा पुनर्विकास, शहरांचं वृद्धी केंद्रांमध्ये रुपांतर, तसंच पाणी आणि स्वच्छता या समस्यांवर काम केलं जाईल. याशिवाय १० हजार कोटी रुपयांचा स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंडही केंद्र सरकार सुरू करणार आहे.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधल्या दिब्रुगढमध्ये मोरान बायपास इथल्या आपत्कालीन परिस्थितीत विमानं उतरवण्याच्या धावपट्टींचं उद्घाटन केलं. आसाम भेटीसाठी ते आज सकाळी याच धावपट्टीवर उतरले. भारतीय हवाई दलाच्या सहकार्यानं दिब्रुगढमधल्या एका राष्ट्रीय महामार्गालगत या धावपट्ट्या उभारल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानं उतरवणं आणि त्यांचं उड्डाण करण्यासाठी या धावपट्ट्या विकसित केल्या आहेत. उद्घाटनानंतर प्रधानमंत्र्यांनी लढाऊ विमानं, वाहतूक विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या हवाई प्रात्यक्षिकांचीही पाहणी केली. पीएम-ई बस सेवा योजनेअंतर्गत देशातल्या चार शहरांसाठीच्या २२५ इलेक्ट्रिक बसना हिरवा झेंडा दाखवून त्यांनी रवाना केलं. त्यात नागपूरसाठीच्या ५० बसचाही समावेश आहे. या दौऱ्यात त्यांनी आसाममध्ये विविध प्रकल्पांचं लोकार्पण केलं. तसंच भाजपा कार्यकर्त्यांना संबोधितही केलं.

**<><><><>**

भारतानं हवामान कृतीविषयीची आपली वचनबद्धता वाढवली असून देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या जवळपास ५ पूर्णांक ६ टक्के खर्च यावर करत आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दिली आहे. जर्मनीतल्या म्यूनिक इथं हवामान सुरक्षेवरच्या एका परिसंवादात त्या बोलत होत्या. हवामान बदलाचा सामना करताना, ज्या देशांचं प्रदूषण कमी आहे, त्यांना समान आर्थिक भार उचलावा लागू नये, असं मत त्यांनी मांडलं.

**<><><><>**

आर्थिक प्रगती, उद्योग-रोजगार वाढ आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांवर आधारित यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल असल्याची ग्वाही केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी आज दिली. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. २०२६ चा हा अर्थसंकल्प 'अमृतकाळातील विकसित भारत २०४७' च्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असणार आहे. या अर्थसंकल्पातून राज्याला मोठा लाभ मिळाला आहे. राज्यातल्या रेल्वे आणि पायाभूत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक निश्चित करण्यात आली असून राज्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांची रेल्वे तरतूद करण्यात आली आहे, असं त्यांनी सांगितलं. मुंबईतल्या IICT च्या माध्यमातून अनेक ठिकाणी छोटी केंद्र सुरू करणं, पुणे आणि नागपूरला ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची योजना आणि विविध परिवहन प्रकल्पांचा राज्याला फायदा होणार आहे, असं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या लांब पल्ल्यांच्या ट्रेनमध्ये आता दर तासा-दीड तासाला स्वच्छता केली जाणार आहे. तसंच सर्वसाधारण वर्गाच्या कोचची स्वच्छताही प्रथम श्रेणी दर्जाच्या कोचप्रमाणेच केली जाईल, अशी घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. नवी दिल्ली इथं रेल्वे सुधारणांवरच्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. सुरुवातीला ८० ट्रेनमध्ये ही स्वच्छता मोहीम राबवली जाईल, त्यासाठी विशेष कर्मचारी नेमण्यात येतील. शौचालयं, कचऱ्याचे डबे आणि केबिनची सतत स्वच्छता केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. अंथरुण, पांघरुणांचं वाटप, संकलन, पॅकिंग आणि स्वच्छतेचं काम यापूर्वी वेगवेगळ्या कंपन्यांना दिलं जात होतं, आता ते एकाच कंपनीला दिलं जाईल, जेणेकरून जबाबदारी निश्चित करून कार्यक्षमता वाढवता येईल, असंही वैष्णव यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता पाचव्या औद्योगिक क्रांतीला बळ देईल, असा विश्वास केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. यावर्षी भारत जगातल्या मोठ्या एआय परिषदांपैकी एका परिषदेचं यजमानपद भूषवणार असून अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रावरचा भारताचा प्रभाव यातून दिसून येतो, असं वैष्णव म्हणाले. देशातले विद्यार्थी, उद्योजक आणि समाजानं एआय क्रांतीसाठी तयार राहावं, असं आवाहनही त्यांनी केलं. आज जगातल्या सगळ्या मोठ्या सेमीकंडक्टर कंपन्या, त्यांच्या सगळ्यात आधुनिक चिपचं डिझाइन भारतात करत आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

मुंबईत मुलुंड इथं एल. बी. एस. मार्गावर बांधकाम सुरू असलेल्या मेट्रोच्या खांबाचा काही भाग दुपारी कोसळून एकाचा मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले आहेत. आज दुपारी साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. राज्य सरकार, मृताच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च करेल, असं ते म्हणाले. या घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल, असं आश्वासन त्यांनी नागपूर इथं वार्ताहरांशी बोलताना दिलं.

<><><><>

ठाणे जिल्ह्यात डोंबिवली इथं पोलिसांनी आज सुमारे २ कोटी १५ लाख रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले. पोलिसांनी गस्तीदरम्यान तीन नायजेरियन नागरिकांना हटकल्यानंतर त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी त्यांना पकडलं आणि अटक केली. त्यांच्याकडून कोकेन आणि मेफेड्रोन हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

<><><><>

बांग्लादेशातल्या नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी बुधवारी होणार आहे. देशात कायदा आणि सुव्यवस्था मजबूत राखणं ही या सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असेल असं बांग्लादेश नॅशनलिस्ट पक्षाचे अध्यक्ष तारीक रेहमान यांनी सांगितलं. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाला भरघोस बहुमत मिळालं आहे. त्यानंतर ढाक्यात आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. लोकशाही पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी संयम आणि एकता दाखवावी असं आवाहन त्यांनी केलं. शांततापूर्ण वातावरणात झालेल्या या निवडणुकांबद्दल त्यांनी अंतरिम सरकार, निवडणूक आयोग आणि सुरक्षा यंत्रणांचे आभार मानले.

**<><><><><>**

बाहरीनमध्ये सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक पॅरा बॅडमिंटन स्पर्धेत एस एल थ्री प्रकारात भारताच्या प्रमोद भगत यानं सुवर्णपदकावर नाव कोरलं. अंतिम सामन्यात त्यानं इंडोनेशियाच्या प्रतिस्पर्ध्यावर २१-१२, २१-१८ अशी थेट गेममध्ये मात केली. जागतिक अजिंक्यपद स्पर्धांमध्ये एकेरीतलं प्रमोद भगत याचं हे सलग चौथं, तर एकंदर सहावं पदक आहे.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अहमदाबाद इथं ड गटात न्यूझिलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला सामना सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

स्पर्धेत आज कोलकाता इथं झालेल्या सामन्यात इंग्लंडनं स्कॉटलंडवर ५ गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडनं इंग्लंडसमोर विजयासाठी १५३ धावांचं आव्हान ठेवलं होतं. इंग्लंडनं टॉम बॅनट याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर १८ षटकं आणि २ चेंडूंमध्ये ५ गड्यांच्या मोबदल्यात हे आव्हान पार केलं.

कोलंबो इथं ब गटात झालेल्या दुसऱ्या एका सामन्यात आयर्लंडनं ओमानवर ९६ धावांनी विजय मिळवला. आधी फलंदाजी करताना आयर्लंडनं ओमानसमोर विजयासाठी २३६ धावांचं आव्हान ठेवलं होतं. प्रत्युत्तरात ओमानचा संपूर्ण संघ १८ षटकांमध्ये १३९ धावाच करू शकला.

स्पर्धेतला भारताचा यापुढचा सामना उद्या पाकिस्तानबरोबर होणार आहे. हा सामना कोलंबो इथं खेळवला जाईल.

//<><><><><>//